



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २९४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०५ जून २०२५


## बँगलोरने 'कप जिंकला' अन चाहत्यांनी 'जीव' गमावला !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, बंगळुरु :** आयपीएल २०२५ चा अंतिम सामना जिंकत पहिल्यांदाच जेतेपद पटकावणारा आरसीबीचा संघ आज बंगळुरुत दाखल झाला. यावेळी संघातील खेळाडूंना पाहण्यासाठी त्यांच्या चाहत्यांनी, पाठिराख्यांनी तोबा गर्दी केली. गर्दी अनियंत्रित झाल्यानं चेंगराचेंगरी होऊन ८ जणांचा मृत्यू झाला. तर २५ जण जखमी झाले. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्यानं मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे. या दुर्घटनेनं आरसीबीच्या विजयाला गालबोट लागलं आहे.



आरसीबीच्या खेळाडूंना पाहण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चाहत्यांनी मोठी गर्दी केली. चाहते झाडावर, भिंतीवर, कारवर चढून लाडक्या खेळाडूंची वाट पाहत होते. त्यावेळी गर्दी नियंत्रणाबाहेर गेली आणि एकच गोंधळ उडाला. चेंगराचेंगरी होऊन काही जण खाली पडले. तेव्हा अनेक जण गर्दीतून सुटका करण्यासाठी पळू लागले. खाली पडलेले सगळेच जण धावणाऱ्यांच्या पायाखाली आले आणि या सगळ्यात अनेक जण जखमी झाले. प्रत्यक्षदर्शींनी चेंगराचेंगरीवेळी घडलेली परिस्थिती सांगितली.

'स्टेडियममध्ये प्रवेश मिळवण्यासाठी गेटवर मोठी गर्दी होती. गेटजवळ मुलींची संख्या जास्त होती. गेट उघडावा यासाठी मुली धक्का मारत होत्या. स्टेडियममध्ये शिरण्यासाठी त्यांचा आटापिटा सुरु होता. माझ्या डोळ्यांदेखत तीन मुली पडल्या. पण त्यांना कोणीही वाचवलं नाही,' असा घटनाक्रम प्रत्यक्षदर्शीनं कथन केला.

एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना महेश नावाच्या व्यक्तीनं थरारक प्रसंग सांगितला. 'विराट कोहली आणि आरसीबीच्या संघाला पाहण्यासाठी खूप गर्दी झाली होती. बऱ्याच मुली स्टेडियमच्या गेटजवळ उभ्या होत्या. त्यांनी आत जाण्याचा प्रयत्न केला. मी तीन मुलांना पडताना पाहिलं. पण त्यांना कोणीही वाचवलं नाही. गर्दीसमोर पोलीसदेखील असहाय होते,' असं महेश यांनी सांगितलं.

लिंगराजपुरमला राहणाऱ्या इनायत यांनीदेखील अंगावर काटा आणणारा घटनाक्रम कथन केला. 'अनेकांजवळ पास नव्हते. ते स्टेडियममध्ये प्रवेश मिळण्याची वाट पाहत होते. गेट क्रमांक १ थोडा उघडण्यात आला. तेव्हा सगळ्यांनी आत शिरण्याचा प्रयत्न केला. पास नसलेल्यांनीदेखील आत घुसण्याचा प्रयत्न केला. यामुळे गोंधळ उडाला. चेंगराचेंगरी झाली. अनेक जण जमिनीवर पडले. गर्दीवर कोणाचंच नियंत्रण नव्हतं,' असं इनायत यांनी सांगितलं.

## एसटी कर्मचाऱ्यांना मिळणार ५३ टक्के महागाई भत्ता ; १ कोटीचा विमा, १ वर्ष मोफत प्रवास पास

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मूळ वेतनावर जून २०२५ पासून ४६ टक्के ऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास ९ ऐवजी १२ महिन्यासाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनीधींची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजीत अडसूळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, सामान्यांसाठी जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या बससेवेच्या माध्यमातून लोकांना अपेक्षित अशी चांगली सेवा मिळाली पाहिजे. बसगाड्या सोबतच बसस्थानके देखील स्वच्छ असली पाहिजे. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य दिले पाहिजे. एसटीच्या माध्यमातून कार्गो सेवा सुरू करण्यावर भर देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. बसस्थानके हे बस पोर्ट झाली पाहिजे असे सांगत एसटी अधिक फायद्यात राहण्यासंदर्भात अभ्यास करा. एसटीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे शिंदे यांनी सांगितले.

यावेळी संघटनांच्या प्रतिनीधींनी विविध मागण्या केल्या. एसटीची उत्पन्न वाढ, इंधन बचत, यावरही चर्चा झाली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना मुळ वेतनावर ४६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येत आहे. जून २०२५ च्या वेतनापासून मूळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत निधीची उपलब्धता पाहून निर्णय घेण्यात येईल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांना पाच लाखापर्यंत कॅशलेस वैद्यकीय लाभ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचबरोबर धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना देखील सुरू करण्यात आली आहे. या दोन्ही पैकी एक योजना निवडण्याचा पर्याय कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना स्टेट बँकेमार्फत अपघाती विमा कवच लागू करण्याबाबत बँकेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन खाते स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेमध्ये आहेत अशा कर्मचाऱ्यांना कामगिरीवर असताना- नसताना (दोन्ही प्रकरणी) अपघात झाल्यास विमा कवच लागू करण्यात येत आले आहे. त्यामध्ये वैयक्तिक अपघातात निधन झाल्यास एक कोटी, पुर्णतः अपंगत्व आल्यास एक कोटी, अंशतः अपंगत्व आल्यास ८० लाख रुपयांपर्यंत विमा रक्कम दिली जाईल.

एसटीच्या सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या पत्नीला वर्षभर एसटीतून मोफत प्रवास करण्याचा पास देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केली. याचा लाभ सुमारे ३५ हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना होणार आहे.

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यापासून वाचविण्यासाठी वनालगतच्या गावांमध्ये 'एआय' आधारित कॅमेरे बसवावेत - वनमंत्री गणेश नाईक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** वन्यजीव व मनुष्य यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठी राज्यातील ज्या ज्या भागात वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात यावेत. यासाठी राज्य शासनाच्या मार्वल या संस्थेची मदत घेण्यात यावी. येत्या पंधरा दिवसात ही कार्यवाही युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी आज येथे दिले.

विदर्भात विविध ठिकाणी होणाऱ्या मानव व वन्य जीव संघर्ष व वन्य प्राण्यांच्या हल्लुया संदर्भात आज मंत्रालयात बैठक झाली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जायस्वाल, आमदार परिणय फुके, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.





नाईक म्हणाले की, मानव व वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, अशा घटनांमध्ये मानवांचा मृत्यू होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलावीत. वनालगतच्या गावांमध्ये फेन्सिंग करणे, चर खोदणे याबरोबरच वन्य प्राणांची माहिती गावकऱ्यांना कळावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा. यासाठी मार्वल या संस्थेची मदत घ्यावी. यासंदर्भातील प्रस्ताव तातडीने मंजूर करून घ्यावा. यासाठी लागेल तेवढा निधी देण्यात येईल. महाराष्ट्रातील जंगलांमध्ये वन्य प्राण्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे मानव व वन्यजीव संघर्ष होत आहेत. जंगलातील प्राणी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपाय योजना कराव्यात. तसेच अतिरिक्त प्राणी ठेवण्यासाठी खासगी प्राणीसंग्रहालयाचा विचार करावा. वनांमध्ये तृणभक्षक प्राण्यांसाठी गवत व वनस्पतींची मोठ्या प्रमाणात लागवड करावी, जेणेकरून वन्यप्राणी वनाच्या बाहेर येणार नाहीत. तसेच वाघांच्या हल्लयात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. वनांच्या परिसरातील यापूर्वीच मंजूर रस्त्यांची दुरुस्ती परवानगीसाठी अडवणूक करू नये, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, वन्य प्राण्यांपासून वाचण्यासाठी वनालगतच्या गावांमध्ये अर्लाम सिस्टीम असणारे एआय आधारित कॅमेरे लावण्यात यावे. याकामास विलंब लावू नये. वाघांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. तसेच या विषयासंदर्भात दक्षिण आफ्रिका, अमेरिका अशा देशात काय उपाय योजना केल्या जातात त्याचा अभ्यास वन विभागाने करावा. वनालगतच्या जमिनी वन विभागाने भाडे तत्वावर घेऊन त्यावर सोलर प्रकल्प राबवावे.

राज्यमंत्री जयस्वाल यांनी विदर्भातील विविध ठिकाणी वन्य प्राण्यांमुळे प्राण्यांची होणाऱ्या मृत्यूसंदर्भात माहिती दिली. मनुष्य व वन्य प्राणी संघर्ष टाळण्यासाठी कायम स्वरुपी उपाय योजना करण्याची मागणी केली. तसेच जंगलातील अस्तित्वातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वन विभागाने तातडीने कार्यवाही करण्याची तसेच वन्य प्राणी हल्लयातील मृतांच्या वारसांना नोकरी देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

## थोडक्यात

### पहिल्या राष्ट्रकुल योगासन क्रीडा अजिंक्यपद स्पर्धेत भारताने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०४, मुंबई :**



इंडोनेशिया(बाली) येथे झालेल्या पहिल्या राष्ट्रकुल योगासन क्रीडा अजिंक्यपद स्पर्धेत २०२५ मध्ये भारताच्या ऐतिहासिक विजयाची भारतीय योगासन क्रीडा महासंघाने अभिमानाने घोषणा केली.या अभूतपूर्व कार्यक्रमात जगभरातील १२ राष्ट्रांचा उत्साही सहभाग होता आणि राष्ट्रकुल क्रीडा व्यासपीठाचा भाग म्हणून योगासनाची अधिकृत ओळख झाली.

भारतीय योगासनाच्या इतिहासातील सर्वात तरुण राष्ट्रीय महासचिव डॉ.अरविंद लक्ष्मीनारायणन यांच्या धाडसी आणि दूरदर्शी नेतृत्वाखाली टीम इंडियाने अभूतपूर्व कामगिरी केली. या ऐतिहासिक जागतिक स्पर्धेत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावत एकूण चॅम्पियनशिप ट्रॉफी जिंकली.सुमती राजू मोगाविरा या योग प्रशिक्षक आहेत. त्यांनी या स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

### वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर... सोलापुरातील आशाराणी भोसले प्रकरणाने खळबळ

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.०४, सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील चिंचोली एमआयडीसी, तालुका मोहोळ येथे राहणाऱ्या २६ वर्षीय सौ. आशाराणी भोसले यांनी दिनांक ३ जून २०२५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली, असा प्राथमिक अंदाज माध्यमांतून समोर आला आहे. मात्र ही आत्महत्या नसून सासरच्या मंडळींच्या मानसिक छळामुळे त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

या दुर्दैवी घटनेची गंभीर दखल विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली असून, त्यांनी तातडीने सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली व सखोल तपास करण्याचे निर्देश दिले आहेत. आशाराणी भोसले या तीन महिन्यांच्या गर्भवती होत्या, आणि त्यांना दोन वर्षांची मुलगीही आहे, ही बाब मन हेलावणारी आहे. त्यांच्या नातेवाईकांनी सांगितल्याप्रमाणे, सासरच्या मंडळींकडून त्यांना सातत्याने छळ सहन करावा लागत होता. चार ते पाच वेळा घरगुती वाद निर्माण झाल्यानंतर त्यांच्या माहेरच्या मंडळींनी मध्यस्थी करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र अखेर या मानसिक छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केली असावी, असा संशय व्यक्त होत आहे. पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर लगेचच सोलापूरात घडलेली ही घटना महिलांच्या सुरक्षिततेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करत डॉ. गोऱ्हे यांनी या प्रकरणी पोलीस प्रशासनाला सखोल आणि निष्पक्ष तपासाचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यांनी सांगितले की, ही आत्महत्या की पूर्वनियोजित हत्या याचा तपास वैज्ञानिक आणि न्यायवैद्यकीय पद्धतीने करण्यात यावा. घटनास्थळाचा पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, आणि गळफास लावण्याच्या स्थितीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करावा. या प्रकरणात सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून, डॉ. गोऱ्हे यांनी तत्काळ आरोपींना अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत. कोणताही दबाव न घेता कायद्याच्या चौकटीत निष्पक्षपणे आणि जलदगतीने तपास करून न्याय दिला जावा, अशी आग्रही भूमिका डॉ. गोऱ्हे यांनी घेतली आहे. पीडित कुटुंबाला आवश्यक ती कायदेशीर व मानसिक मदत सरकारमार्फत पुरवण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. या अनुषंगाने, पोलीस अधीक्षकांनी माहिती दिली की आशाराणी यांची दोन वर्षांची मुलगी सध्या तिच्या आजोबा-आजींकडे म्हणजेच आईच्या माहेरी आहे. यावर प्रतिक्रिया देताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, या बाळासाठी कोर्टाची ऑर्डर घ्यावी लागेल का, की तिच्या माहेरची मंडळी स्वतः तिला सांभाळण्यासाठी तयार आहेत, याची माहिती घेऊन त्यानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवावी.

### हरवलेली बॅग तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने परत मिळाली

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०४, डोंबिवली :** विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आज सकाळी ७ वाजेच्या सुमारास एक महत्त्वाचा प्रकार घडला. दीपक झोरे नावाचे इसम डोंबिवली स्टेशनहून कोपरगावच्या दिशेने प्रवास करत असताना त्यांनी रिक्षामध्ये आपली बॅग विसरून ठेवली होती. या बॅगमध्ये सुमारे ३ तोळे सोनं आणि एक मोबाइल फोन होता. झोरे यांनी तत्काळ विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. आजच्या युगातील तांत्रिक साधनांचा वापर करत, सीसीटीव्ही फुटेज व अन्य विश्लेषणाच्या आधारे रिक्षाची ओळख पटवण्यात आली आणि संबंधित बॅग काही तासांतच परत मिळवण्यात पोलिसांना यश आले.ही बॅग दीपक झोरे यांच्याकडे सुरक्षितपणे सुपूर्द करण्यात आली असून त्यांनी विष्णुनगर पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि तांत्रिक क्षमतेमुळे आणखी एक हरवलेले मौल्यवान सामान मालकाकडे सुखरूप परत पोहोचले आहे.

# संपादकीय

## पर्यावरणाचे रक्षक बना, भक्षक नको

**निसर्ग सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करायला समर्थ आहे, निसर्गाचा आनंद घ्यायचा, तो ओरबाडायचा नाही.**
**– महात्मा गांधी**

किती समर्पक शब्दांत महात्मा गांधींनी पर्यावरणाचे महत्त्व आपणास पटवून दिलेले आहे. 'पर्यावरण' म्हणजेच परि + आवरण आपल्या अवतीभवती असलेले डोंगर, दऱ्या, वनस्पती, प्राणी, पाणी, आकाश, भूमी, ऊन, वारा, पाऊस अशा सर्व संबंधित घटकांनी एकत्रितरीत्या जे आवरण निर्माण केले जाते. तेच पर्यावरण आहे. निसर्गाच्या सान्निध्यात माणूस जन्माला येतो. घडतो, आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करतो, त्या निसर्गातील प्रत्येक घटक हा अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. यातील एकही घटक जर कमी जास्त झाला त्याचे दूरगामी परिणाम सजीवांवर होतात. सर्व सजीवांचे अस्तित्व हे पर्यावरणावर अवलंबून असते. पर्यावरणाचे संतुलन हा सजीव व निर्जीव वस्तूंचा प्राण आहे. स्थळ बदलले की पर्यावरण बदलते. बदललेल्या पर्यावरणाचा सजीवांवर फार मोठा परिणाम होतो.

अविवेकी, स्वच्छंद, स्वैराचारी आणि सुखलोलूप जीवनशैलीमुळे मानवाने स्वार्थापोटी संपूर्ण जग प्रदूषित केले आहे. जगात निर्माण झालेल्या या वाढत चाललेल्या प्रदूषणाचा फार मोठा परिणाम मानवावर होत आहे. मानवाच्या विकृत वागण्यामुळे अनेक प्रकारच्या प्रदूषणाला आपणास तोंड द्यावे लागते आहे.

बदलत्या पर्यावरण चक्रामुळे पावसाचे दिवस कमी होत चालले आहेत. आजकाल वर्षातून जेमतेम ३० ते ४० दिवस पाउस पडतो. कमी दिवसांत पडणाऱ्या पावसाला प्रचंड वेग असतो. त्यामुळे पडणारा पाऊस तितक्याच वेगाने वाहूनही जातो. तो कमी प्रमाणात जमिनीत मुरतो, त्याचा परिणाम म्हणून भू-जलाची पातळी खाली जाते.

**जल प्रदूषण :** वाढत्या औद्योगिकरणामुळे बरेचसे पाणी दूषित केले जाते. ते दूषित पाणी नदीमध्ये प्रक्रिया न करता सोडले जाते. तळी, नदी, किनाऱ्यावर धार्मिक विधी केले जातात व त्यातील फुले व अन्नपदार्थ नदीमध्ये फेकले जातात. मेडिकल कचरा, मेलेली जनावरे, गणपती उत्सवांतील विसर्जित मूर्ती इत्यादींमुळे नदी प्रदूषित होते. पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे नदीमधील नैसर्गिक स्रोत बंद झालेत. उद्योगातून बाहेर पडणारे प्रदूषित पाणी, पारा, सायनाइड, निकेलयुक्त असल्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार दूषित पाण्यामुळे जगामध्ये दररोज ५००० बालकांचा मृत्यू होत असतो.

**वायुप्रदूषण :** औद्योगिक क्षेत्रामधून फार मोठ्या प्रमाणावर अनेक प्रकारचे वायू हवेत सोडले जातात. प्लास्टिक कचरा, पालापाचोळा इत्यादी वस्तू जाळल्यामुळे हवेत घातक वायूंचे प्रमाण फार वाढले आहे. त्यामुळे मोठ्या शहरात व औद्योगिक वसाहतीमध्ये शुद्ध हवा मिळणे अशक्यप्राय झाले आहे. तसेच सर्व प्रकारच्या वाहनांमधून बाहेर पडणारा वायू हा खूपच घातक ठरत आहे. जुन्या वाहनांची योग्य प्रकारे काळजी न घेतल्यामुळे वायुप्रदूषणामध्ये प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे आपल्या देशात लवकरच ऑक्सिजन देणारे बूथ रस्त्यारस्त्यात बसस्थानकावर, रेल्वेस्थानकावर ठेवावे लागणार आहेत.

**ध्वनी प्रदूषण :** वाहनांचे कर्कश हॉर्न, लग्न व धार्मिक समारंभातील डीजे, लाउडस्पीकर, मोटारसायकलचे नवीन प्रकारचे सायलेन्सर इत्यादी गोष्टींमुळे ध्वनी प्रदूषणामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. त्याचा परिणाम मानवाच्या श्रवणशक्तीवर झाला आहे.

**प्लास्टिकमुळे होणारे प्रदूषण :** प्लास्टिकच्या अनिर्बंध वापरामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. प्लास्टिक बंदी केलेली असलेली तरी प्रभावी अंमलबजावणी नसल्यामुळे प्लास्टिकचा सर्रास वापर शहरात होताना दिसत आहे. प्लास्टिकच्या पिशव्या, कागद, प्लास्टिक पॅकिंग मटेरियल, या सर्वांमुळे सांडपाण्याचे नाले बंद होतात व शहरामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. प्लास्टिक पिशव्यांतून केरकचरा, खराब झालेले अन्न पदार्थ रस्त्यावर फेकले जातात. भूमी प्रदूषण : रासायनिक खतांच्या वापरामुळे सुपीक जमीन क्षारयुक्त झालेली आहे. तसेच पिकांवर जी रसायनयुक्त कृत्रिम जंतुनाशकांची फवारणी केली जाते, त्यामुळे ती जमीन हळूहळू नापीक होते. त्यामुळे धान्य उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत नाही.

**अंतराळ प्रदूषण :** जगातील अनेक देशांतून माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगासाठी अनेक सॅटेलाइट्स सोडलेले आहेत. बऱ्याचशा सॅटेलाइटचे आयुष्य हे मर्यादित असते, त्यानंतर अनेक वर्षे हे निरुपयोगी सॅटेलाइट भ्रमण करत असतात, कधी कधी ते पृथ्वीवरदेखील आदळतात. त्यामुळे अंतराळामध्ये फार मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते.

# जगप्रसिद्ध कोणार्कचे सूर्य मंदिर

**श्रीराम सा. महाजन**
**( कला शिक्षक )**
**चेंबूर कर्नाटका हायस्कुल चेंबूर. मुंबई**



भारतातील ओडिशा येथील १३ व्या शतकातील सूर्य मंदिराचा भाग म्हणून गुंतागुंतीने कोरलेले कोणार्क चाक सांस्कृतिक, स्थापत्य आणि खगोलशास्त्रीय महत्त्वाचे आहे. सूर्यदेवाच्या रथाचे प्रतिनिधित्व करणारे, चाकाचे १२ जोड्या महिन्यांचे प्रतीक आहेत आणि त्याची रचना सूर्याच्या हालचालींचा मागोवा घेणारी सूर्यघडी म्हणून काम करते .कोणार्क सूर्य मंदिर हे १३ व्या शतकातील हिंदू सूर्य मंदिर आहे जे भारतातील ओडिशा राज्यातील पुरी जिल्ह्यातील किनारपट्टीवर पुरी शहरापासून सुमारे ३५ किलोमीटर (२२ मैल) ईशान्येस कोणार्क येथे आहे. हे मंदिर १२५० च्या सुमारास पूर्व गंगा राजवंशातील राजा नरसिंह देव प्रथम यांना दिले जाते . हे हिंदू ओरिसा वास्तुकलेचे शिखर आहे.

हिंदू धर्मातील मंदिरे ही सर्वात महत्वाची ठिकाणे मानली जातात. त्यांना एक पवित्र स्थान म्हणून पाहिले जाते जिथे हिंदू त्यांच्या देवतांची पूजा करण्यासाठी आणि त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी जाऊ शकतात . मंदिरे एखाद्याच्या मनात एक महत्त्वाचे स्थान ठेवतात आणि बहुतेकदा आशेचे प्रतीक म्हणून पाहिले जातात. अनेक हिंदूंसाठी, कठीण काळात मंदिर हे आश्रयस्थान असते.

कोणार्क सूर्य मंदिराची रचना एका प्रचंड रथाच्या आकारात केली आहे, ज्यामध्ये बारा जोड्या सुरेखपणे कोरलेल्या दगडी चाकांसह सूर्याच्या रथाचे प्रतीक आहेत . ही अनोखी आणि आकर्षक रचना त्या काळातील स्थापत्यकलेची तेजस्वीता दर्शवते.

लोकांचा असा विश्वास आहे की १२ वर्षांचा तो मुलगा स्वतः सूर्य देव होता आणि तेव्हापासून कोणार्क मंदिरात पूजा विधी केले जात नाहीत. या मंदिरातील सर्वात अविश्वसनीय श्रद्धांपैकी एक म्हणजे सूर्य देवाची मूर्ती त्याच्या बांधकामादरम्यान चुंबकांच्या वापरामुळे हवेत लटकली होती .कोणार्क सूर्य मंदिराचे सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या प्रवेशद्वारावर असलेले भव्य रथ शिल्प, ज्याला ७ घोडे ओढतात. घोडे अशा प्रकारे कोरलेले आहेत की ते धावत असल्याचे दिसते, त्यांच्या मागे त्यांचे माने आणि शेपटी वाहत आहेत. हे सूर्यदेव सूर्याच्या रथाचे प्रतिनिधित्व करते असे मानले जाते.

**कोणार्क चाकाचे महत्त्व...**

मंदिरात २४ (१२ जोड्या) चाके आहेत जी भगवान सूर्याच्या सूर्य रथाच्या चाकांचे प्रतिनिधित्व करतात . १२ चाके वर्षातील १२ महिने दर्शवितात आणि ८ आरे दिवसाच्या ८ प्रहार किंवा वेळेचे विभाजन दर्शवितात.

१९८४ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले , हे हिंदूंसाठी एक प्रमुख तीर्थस्थळ आहे , जे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात चंद्रभागा मेळ्यासाठी येथे जमतात .

भारतीय सांस्कृतिक वारशाचे महत्त्व दर्शविणारे कोणार्क सूर्य मंदिर १० रुपयांच्या भारतीय चलनाच्या नोटेच्या उलट बाजूस चित्रित केले आहे .

**कोणार्क सूर्य मंदिरात जाण्यासाठी**

ओडिशा राज्यातील चंद्रभागा नदीच्या काठावरील कोणार्क सूर्य मंदिर पर्यटन स्थळाला भेट देण्यासाठी फेब्रुवारी ते ऑक्टोबर हा काळ सर्वोत्तम मानला जातो. कोणार्क हे एक छोटेसे ठिकाण आहे, जिथे हे मंदिर आहे, म्हणून प्रथम जवळच्या शहरांमध्ये पोहोचावे लागते आणि नंतर कोणार्क मंदिरात जावे लागते.

विमानाने भुवनेश्वर विमानतळापासून कोणार्क ६५ किमी अंतरावर आहे. तुम्ही विमानाने भुवनेश्वरला पोहोचू शकता आणि तेथून बस किंवा टॅक्सीने तुम्ही कोणार्क मंदिरात जाऊ शकता.

ट्रेनने कोणार्कच्या जवळची रेल्वे स्टेशन भुवनेश्वर आणि पुरी आहेत. कोणार्क हे भुवनेश्वरपासून पिपली मार्गे ६५ किमी आणि मरीन ड्राइव्ह रोडवर पुरीपासून ३५ किमी अंतरावर आहे. पुरी हे दक्षिण पूर्व रेल्वेचे शेवटचे ठिकाण आहे. पुरी आणि भुवनेशीर सुपरफास्ट ट्रेन आहेत ज्याद्वारे तुम्ही येथे आल्यानंतर टॅक्सी किंवा बसने कोणार्कला पोहोचू शकता.

बसने कोणार्क भुवनेश्वर पासून पिपली मार्गे कोणार्कला जाता येते.पुरी आणि भुवनेश्वर येथून कोणार्कसाठी नियमित बस सेवा आहेत. सार्वजनिक वाहतुकीव्यतिरिक्त, पुरी आणि भुवनेश्वर येथून खाजगी पर्यटन बस सेवा आणि टॅक्सी देखील उपलब्ध आहेत.

कोणार्कचे सूर्य मंदिरचे काम भारतीय वास्तुविशारदांच्या कौशल्याचे अप्रतिम उदाहरण आहे.

मंदिरातील कोरीव काम वास्तुकलेचे उत्कृष्ट नमुना आहे, जी प्राचीन भारतीय संस्कृती आणि कला कौशल्याची साक्ष देते.पर्यटकांसाठी सर्व सोयीसुविधा असल्यामुळे देश विदेशातील पर्यटक भारताचा समृद्ध वारसा पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात येथे भेट देतात. कोणार्कचे सूर्य मंदिर जगभरातील पर्यटकांचे एक आकर्षण केंद्र आहे.

# जागतिक पर्यावरण दिन

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुमान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात ( युनो ) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम णपळींशव छरींळेपी एपींळर्ऑपाशपीं झर्ऑसऑरा ( णछएझ ) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर आयोजित करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते . २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. मागील वर्षी सौदी अरेबिया हा जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. या वर्षी म्हणजे २०२५ साली दक्षिण कोरिया जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषण थांबवा ही यावर्षीची थीम आहे. या थीमचा संदेश आहे की प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जागतिक स्तरावर एकत्र येऊन काम करणे. णछएझ नुसार पप्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे, जी पर्यावरणास आणि मानवी आरोग्यास धोकादायक आहे. आजच्या दिवसाचे औचित्य साधून जगभर प्लास्टिक प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास आणि प्लास्टिक मुक्तीचा ध्यास घेतल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## वाऽहवा..

लाडक्या योजनेला
कुठूनि पैसा घ्यावा
चिंता सतावते मना
कसा न्याय रे द्यावा

योजनाजाहीर होई
सर्वत्रचाले वाीहवा
दुःखी कष्टी भगिनी
बदले आल्हाद हवा

लुटून नेतात दोडके
आया बहिणी नावा
वंचितताईंस पाहता
वेदना होतात भावा

ताळेबंद जमवताना
सतत घोर हो जीवा
अन्याय नको इतरां
करावी लागते पर्वा

चाले अव्याहत सारे
जरासाविश्वास ठेवा
गैर मार्गाने ना जावा
जनतेचाअमूल्यठेवा

निर्मळ मनात इच्छा
कल्याणकरुन दावा
आधी करुन दावले
नंतरचं केलेला दावा

सु योग्य विनियोगाने
लाखों जणींचा दुवा
संसारबनता सुखाचे
अंतरात उजळे दिवा

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# वाचक पत्र




## बकरी ईदनिमित्त गोहत्या नकोच !

बकरी ईदच्या जवळ आली आहे. भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणामुळे गोवंश हत्येच्या आणि गोतस्करीच्या बातम्या प्रतिदिन वृत्तपत्रांतून वाचनात येत आहेत. गाय जशी हिंदूंसाठी पूजनीय आहे तशी ती अत्यंत उपयुक्त पशु सुद्धा आहे त्यामुळे तिचे पालनपोषण आणि संरक्षण करणे आज नितांत गरजेचे आहे यासाठीच सरकारने राज्यात गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा संमत केला; मात्र त्यानंतरही गोवंश हत्येवर अंकुश आलेला नाही. या कायद्याच्या अंतर्गत कोणाला शिक्षा झाल्याचेही आजतागायत ऐकिवात नाही. गोवंश नेणाऱ्या वाहनांवर, कसायांवर कारवाई केली गेली तरी त्यांच्यावर वेगळीच कलमे लावली जातात असाही आरोप गोरक्षकांकडून करण्यात येतो, त्यामुळे या गोतस्करांना काही वेळातच जामीन मिळतो. गोवंशाची सुटका करण्यासाठी गेलेल्या गोप्रेमींवर आणि पोलिसांवर गोतस्करांकडून आणि कसायांकडून बऱ्याचदा प्राणघातक हल्ले केले जातात. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय. धर्मनिरपेक्ष शासनप्रणाली अवलंबलेल्या भारतात सर्व धर्मियांना त्यांचे सण, उत्सव साजरे करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे; मात्र ते साजरे करत असताना अन्य धर्मियांच्या धार्मिक भावनांना डिवचण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना शिक्षा करण्याचे प्रयोजनही संविधानाने केले आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याचे दायित्व असणारी पोलीस यंत्रणा हिंदूंच्या धार्मिक भावनांची कदर करणार आहे का ?

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

# नुकत्याच केलेल्या दुर्गाडी किल्ल्याच्या भिंतीचं काम कोसळलं...

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०४, कल्याण :** नुकत्याच बांधलेल्या दुर्गाडी किल्ल्याच्या संरक्षण भिंतीचं काम थोड्या पावसात पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास कोसळल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. लाखो रुपयांचा खर्च करून उभं केलेलं हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचं असल्याचा आरोप होत असून, या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना शिवसेनेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी जोडलेल्या दुर्गाडी किल्ल्यावर अशा प्रकारची निकृष्ट कामं होणं अत्यंत दुर्दैवी आहे. विश्वनाथ भोईर यांनी ठेकेदाराला इशाराही दिला. ज्या ठेकेदाराने हे काम केलं, तो अजूनही दुर्गाडी परिसरात न आल्यास त्याला शिवसेना स्टाईलमध्ये उत्तर दिलं जाईल. आम्ही हे सहन करणार नाही, असा कठोर इशारा त्यांनी दिला आहे.दरम्यान, नागरिकांनी देखील या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.लाखो रुपये खर्च करून जर भिंत दोन दिवसांत कोसळत असेल, तर हा थेट जनतेच्या पैशांचा अपव्यय आहे, असे बोलले जात आहे. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल का, हे येणारा काळच सांगेल, मात्र एकंदरीतच दुर्गाडी किल्ल्याच्या या अपघाताने शासनाच्या कामांवरील विश्वासाला तडा गेला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

